आशियातील सर्वात मोठ्या स्वयंसेवी ग्राहक संघटनेचे मुखपत्र

RNI No. MAHBIL/2011/39044

वर्ष १४/अंक १०/जानेवारी २०२६/मूल्य रु. ५/-

Grahak Tituka Melwawa
ग्राहक तितुका मेळवावा

मुंबई ग्राहक पंचायत
ग्राहक हिताय ग्राहक सुखाय

मुंबई ग्राहक पंचायत MGP 50+ सुवर्ण महोत्सवी वर्ष २०२४-२०२५

member of CONSUMERS INTERNATIONAL

जागो ग्राहक जागो



२४ डिसेंबर २०२५ रोजी राष्ट्रीय ग्राहक दिनानिमित्त दिल्ली येथे आयोजित कार्यक्रमात 'सुधारीत UNGCP, २०१५' दशकपूर्ती निमित्त आपण प्रसिद्ध केलेली विशेष पुस्तिका ग्राहक व्यवहार मंत्रालयाच्या सचिव निधी खरे यांच्या हस्ते वितरित करण्यात आली. *(सविस्तर वृत्त पान १० पहा)*

पुण्यातील मुलांना चतुर ग्राहक घडवणारी शिबिरे

• **कल्पिता रानडे**, कार्यवाह, पुणे वितरण समिती

सजग ग्राहकत्वाची राष्ट्रीय ग्राहक दिनाच्या निमित्ताने (२४ डिसेंबर) पुणे वितरण केंद्रातर्फे शालेय कन्झ्युमर क्लबची पुण्यात पुन:श्च मुहूर्तमेढ करण्यात आली. औचित्य साधून पुणे वितरण केंद्रातर्फे दोन शाळांमध्ये मुलांसाठी ग्राहक शिबिर आयोजित करण्याचे ठरले. पुण्यातील आपल्या वितरण व्यवस्थेत सहभागी संघप्रमुखांपैकी दोन संघप्रमुख शाळांच्या व्यवस्थापकीय समितीत सक्रीय आहेत. त्यांनी शाळांच्या मुख्याध्यापकांशी संपर्क करून देऊन, शिबीर घेण्यासाठी सहमती दर्शवली. वितरण केंद्र समिती सदस्या/कार्यकर्त्या कल्पिता रानडे, दीप्ती जोशी, श्रेया सहस्रबुध्दे, स्वाती ओक यांनी तसेच मुंबईहून शिक्षण विभागातून आलेल्या नेहा जोशी यांनी मिळून दोन्ही शाळेतील शिबिरे २३ डिसेंबर २०२५ रोजी घेतली.

प्रगती विद्यालयातील शिक्षकांबरोबर कार्यकर्ते

आनंदक्षण शाळेतील विद्यार्थी वेष्टण वाचनाची माहिती ऐकताना

सिंहगड रोडवरील प्रगती विद्यालय या मराठी माध्यमाच्या शाळेत सहावी ते नववीचे विद्यार्थी या शिबिरात सहभागी झाले, तसेच सन सिटी भागातील आनंदक्षण शाळेतील सहावी ते नववी या गटातील विद्यार्थी शिबिरात सहभागी झाले. प्रगती विद्यालय शाळेतील १४० व आनंदक्षण शाळेची ७० मुले सहभागी झाली होती. त्यांना नेहा जोशी यांनी ग्राहक या शब्दाची संज्ञा तसेच ग्राहक कायदा कधी करण्यात आला, जाहिराती फसव्या आणि भुलवणाऱ्या कशा असतात, विविध मानांकन जसे FSSAI, ISI mark, Hallmark, Agmark यांची ओळख तसेच BIS App कसे वापरावे अशा विषयांची ओळख करून दिली. दोन्ही शाळांमध्ये मुलांनी अतिशय

(पान क्र. २४ पाहा...

RNI No. MAHBIL/2011/39044
मुंबई ग्राहक पंचायत

विश्वस्त मंडळ
डॉ. बाळ फोंडके
अनुराधा गोरे
ललिता कुलकर्णी
अनुराधा नरसाळे
संजीव मंत्री

अध्यक्ष
डॉ. बाळ फोंडके

उपाध्यक्ष
अनुराधा गोरे

कार्यकारी मंडळ
ॲड. शिरीष देशपांडे (कार्याध्यक्ष, स्वीकृत)
अनुराधा देशपांडे (कार्योपाध्यक्ष)
प्रभाकर गवाणे (कार्योपाध्यक्ष)
अनिता खानोलकर (कार्यवाह, स्वीकृत)
रविंद्र सहस्रबुद्धे (खजिनदार)

कार्यकारिणी सभासद
ज्योती मोडक
शीला देवळेकर
राजेंद्र राणे
शुभदा चौकर
अनघा आचरेकर
मंगला गाडगीळ
शर्मिला रानडे
आलोक हर्डीकर
विवेक केळकर
प्रकाश पाटील
उदय पिंगळे (स्वीकृत)
नेहा जोशी
कल्पिता रानडे
विनायक सोमण (स्वीकृत)
सुधीर तावरे

निमंत्रित
- संघटन विभाग प्रमुख

या अंकात प्रसिद्ध झालेल्या मतांशी संपादक/
संघटना सहमत असतीलच असे नाही.

ग्राहक तितुका मेळावा

१ जानेवारी २०२६ | पौष–माघ १९४७

अनुक्रमणिका

पुण्यातील मुलांना चतुर ग्राहक घडवणारी शिबिरे ०२
नवीन वर्षात हे संकल्प जरूर करू! ०४
संपादकीय : सर्वव्यापी संक्रमण ०५
MOFA दुरुस्ती ग्राहकांच्या हिताची नाहीच! ०६
ग्रहक न्यायासाठी अनेक संस्था एकत्र ०७
ग्राहकगोष्ट : माझाही खारीचा वाटा! ०८
MGP निर्मित UN IGE on Consumer... १०
बालदूत : आपण फिट, मैत्री हिट! ११
बालग्राहकांची उत्साही फौज १३
मुलांच्या भल्यासाठी ऑस्ट्रेलियाचे दमदार पाऊल १४
ग्राहक विषयांवर वक्तृत्व स्पर्धा संपन्न १६
नववर्षात नवीन ठिकाणी पंचायत पेठा १७
ग्राहक पंचायत पेठ दालन तक्ता – बोईसर, रत्नागिरी १८
'ब्रेन गेम' कार्यशाळा २०
वाचू आनंदे २१
मालाडमध्ये वारली पेंटिंगची कार्यशाळा २१
NCH Ensures Full Refund to Indigo passengers २२
Govt Announces Ceiling on Airfares २२
EAT RIGHT QUIZ २३

संपादक शुभदा चौकर
संपादकीय साहाय्य नेहा जोशी
सल्लागार ॲड. शिरीष देशपांडे, वसुंधरा देवधर
मुखपृष्ठ राजेंद्र राणे
सजावट अंकुश कांबळे
मुद्रण इंडिया प्रिंटिंग वर्क्स, वडाळा, मुंबई

Printed & Published by **SHUBHADA CHAUKAR** on behalf of **Mumbai Grahak Panchayat**,
Printed at India Printing Works, 42 G. D. Ambekar Marg, Wadala, Mumbai – 400 031 and
Published at Mumbai Grahak Panchayat, Grahak Bhawan, Sant Dnyaneshwar Marg,
JVPD Scheme, Juhu, Vile Parle (West), Mumbai – 400 056. Ph.: 022-4750 8541/42 (Office).
• Email : mpanchayat@gmail.com • Vitaran Email : mgpvitaran@yahoo.co.in
• Website : **https//www.mymgp.org** • Editor : **Shubhada Chaukar**

नवीन वर्षात हे संकल्प जरूर करू!

• अभय दातार

मंडळी, शीर्षक वाचून तुम्ही म्हणाल की एक संकल्प पूर्ण करता करता नाकी नऊ येतात, तर हे काय? किती संकल्प करायचे?

पटतंय तुमचं म्हणणं. पण हे संकल्प वाचल्यानंतर बहुधा तुम्हाला नक्कीच वाटेल की, अरे हो, आपल्या आर्थिक बाबींशी संबंधित असलेले हे संकल्प पूर्ण करायचा पूर्ण प्रयत्न करायला हवा. अर्थात प्रत्येक व्यक्तीला हे संकल्प लागू होतीलच असं नाही. कारण प्रत्येकाच्या गरजा वेगळ्या, प्रश्न वेगळे, मानसिकता वेगळी. हरकत नाही. निदान यापैकी जे जे संकल्प लागू होतात, त्यांचा गंभीरपणे विचार नक्कीच करायला हवा, नाही का? आणि हो, यातील बरेचसे संकल्प एकदाच करायचे आहेत. तर बघू या, या वर्षात कोणकोणते संकल्प करायचे ते.

- माझी बँक खाती, माझी शेअर्स, म्युच्युअल फंड यातील गुंतवणूक, माझ्या विमा पॉलिसीज, पोस्टातील गुंतवणूक योजना, कर्मचारी/भविष्य निर्वाह निधी, या सगळ्यांसाठी मी योग्य प्रकारे नामनिर्देशन (Nomination) केले आहे, याची खातरजमा करेन.

- या सर्वांच्या व्यवस्थित नोंदी करून त्यांची प्रत माझी मुले आणि बायको/नवरा यांना देईन.
- कोणती गुंतवणूक कधी देय आहे, त्याची नोंद ठेवेन आणि ती नियमितपणे तपासेन.

- जर वेगवेगळ्या बँकांत माझी खाती असतील, तर मी त्यांचा आढावा घेईन आणि ज्या खात्यांची आवश्यकता नाही, ती खाती बंद करेन. कोणत्याही प्रकारचा आर्थिक गैरव्यवहार करणारे अशा खात्यांचा दुरुपयोग करतात, याची मी जाणीव ठेवेन.

- माझी, तसेच माझ्या जवळच्या नातेवाईकांची कोणतीही रक्कम दाव्याविना पडून राहिली आहे का, याचा शोध घेईन; आणि तसे आढळले तर त्वरेने योग्य कार्यवाही करेन.
- माझ्या सुहृदांना भविष्यात कोणत्याही प्रकारची अडचण येऊ नये, म्हणून मी माझे मृत्युपत्र तयार करेन.
- कोणतीही देयके देण्यासाठी मी NACH किंवा ऑटो पे या सुविधांचा लाभ घेईन आणि रांगेत उभे राहण्याचे श्रम व वेळ वाचवेन.

- कोणी कितीही मोहात पाडायचा अथवा भीती दाखवायचा प्रयत्न केला, तरीही मी त्याला बळी पडून कोणताही निर्णय घाईघाईने घेणार नाही.
- ज्या कागदपत्रांवर सह्या करायच्या आहेत, त्यातील मजूकर नीट वाचून, समजून घेऊन, पटले तरच मी सह्या करेन.
- मी शाश्वत जीवनशैली जगण्याचा प्रामाणिक प्रयत्न करेन आणि उगीच वायफळ खर्च करणार नाही.
- आर्थिक बाबींसंबंधी आलेल्या कोणत्याही व्हॉट्सअॅप पोस्ट्स मी पूर्ण खात्री करून घेतल्याशिवाय पुढे पाठवणार नाही.



- अवास्तव परतावा देऊ करणाऱ्या कोणत्याही जाहिरातीला अथवा आमिषाला मी बळी पडणार नाही.
- अल्प, मध्यम आणि दीर्घ मुदतीची कोणतीही आर्थिक उद्दिष्टे असतील, तर मी जाणकार व्यक्तींकडून मार्गदर्शन घेऊन त्याचे नियोजन करेन.

२०२६ या नवीन वर्षात मी प्रतिज्ञा करतो/ करते की, मी नेहमी चौकस, दक्ष राहीन आणि माझी व माझ्या कुटुंबियांची आर्थिक फसवणूक होऊ नये म्हणून आर्थिक बाबतीत साक्षर होण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न करेन. ♦

संपादकीय

सर्वव्यापी संक्रमण

जानेवारी महिना! नवीन ग्रेगेरीयन वर्षाची सुरुवात आणि अखिल भारतीय पातळीवर निरनिराळ्या नावांनी साजरा होणारा मकरसंक्रांतीचा सण. आसेतु हिमाचल पोंगल, बिहू, उत्तरायण, लोहरी, पौष संक्रांति किंवा कर्नाटकातला सुग्गी-हब्बा नामक सण. नावं वेगळी असली तरी त्यामागे असते संक्रमणाचे स्वागत. सूर्याचा मकरराशीत प्रवेश, म्हणून मकर संक्रमण. हे संक्रमण आणते वसंताची चाहूल आणि देते सुगीच्या, समृद्धीच्या आगमनाची ग्वाही. म्हणून तर हुरडा पार्टी आणि तीळ-गुळाची लयलूट.

संक्रमण या शब्दाचा कोषातला अर्थ आहे प्रगती, बदल किंवा कठीण काळातून साधलेली प्रगती. आजचा काळ हा संक्रमणाचा आहे असे आपण सर्वार्थाने म्हणू शकतोय. वस्तू/सेवा उत्पादनामागचा विचार व पद्धती, विक्रीची तंत्रे आणि जागतिक पातळीवरील विविध व्यवहार व घटना, यामुळे सर्व जग निरनिराळ्या प्रकारच्या संक्रमणातून वाटचाल करीत आहे, मार्ग काढण्याचा प्रयत्न करीत आहे.जणू काही घुसळण सुरू आहे. तिची सुरुवात विविध वैज्ञानिक शोध लागले त्या काळात, सुमारे ३५० वर्षापूर्वी झाली. ते संक्रमण पचवून नवीन प्रणाली, वाहतूक व्यवस्था, जीवन-शैली इत्यादी अस्तित्वात आल्या, स्थिरावल्या. काळ पुढे जात रहात राहिला. मग मांजरीच्या पावलांनी आली संपर्क क्रांती आणि तिची पुढची पायरी कृत्रिम बुद्धिमत्ता. या वैज्ञानिक प्रगती आणि संशोधनामागचे अथक परिश्रम आणि मानवी बुद्धिमत्तेची झेप, दोन्ही सामान्य माणसाला अचंबित करणारे, पण आकलनाच्या पलीकडले.

मात्र हे संक्रमण वाटते तितके अचानक झालेले नाही. ते हळूहळू सर्वगामी होत गेले आणि आपण ग्राहक टप्प्या-टप्प्याने त्याच्या आहारी जात राहिलो. त्यामुळे अनेक सोयी आज उपलब्ध आहेत, हे नाकारण्याचा प्रश्नच नाही. पण कृत्रिम बुद्धिमत्ता आणि काही 'उपयुक्त' उत्पादने या द्वारे होणारे संक्रमण हे खरच संक्रमण आहे की अतिक्रमण, याविषयी विचार करणे ही या नव्या वर्षातील पहिली गरज आहे. आता शेती आणि अन्नापासून औषधापर्यंत अनेक उत्पादनासाठी कृत्रिम प्रज्ञेचा उपयोग होतो आहे. प्रदीर्घ मजकुराचे सार काढून देणे ते रोगनिदान करणे अशी कामे ती करतेच आहे. इतकेच नव्हे तर साहित्य-शास्त्र-कला ही खास दालने कृत्रिम प्रज्ञेने आक्रमित केली आहेत. त्यातून नवीन समस्या निर्माण होऊ घातल्या आहेत. सृजनशील वाटणारी कृती एखाद्या ॲप्लिकेशनद्वारे निर्माण करून त्यावर आधारित कलाकृती बाजारात विक्रीस आली आहे, हे पारदर्शकपणे सामान्य ग्राहकाला कळण्याची सोय हवी की नको?

हे इथेच थांबत नाही. आता तर कृत्रिम प्रज्ञेचा उपयोग करणारे चष्मे आणि गॉगल्स उपलब्ध आहेत. हेरगिरीकरिता म्हणून! चष्म्याच्या नाकावर टेकणाऱ्या भागात चक्क कॅमेरा आणि कानावर टेकणाऱ्या आधाराच्या काडीत फोटो साठवण्यासाठी चीप व ऑफ/ऑन बटन असणारे चष्मे बाजारात आहेत. अशा चष्म्यातील कॅमेरा आणि चीप किती पॉवरफुल पाहिजे, अशी निवड करण्याची सोय ग्राहकांना आहे. चुपचाप, कुणाच्याही नकळत दर्जेदार फोटो आणि व्हिडीओ काढता येणार आहेत. असे हे उपकरण नक्की कोणत्या हेरासाठी म्हणून बाजारात सहज उपलब्ध केले जात असेल? त्याचा दुरुपयोग झाला तर दाद कुठे मागायची? असे प्रश्न तमाम जनतेला पडायला हवेतच. पण जागरूक ग्राहक म्हणून आपण तरी ते विचारलेच पाहिजेत.

संक्रमण घडविणाऱ्या कोणत्याही संशोधनाचा योग्य उपयोग होणे, अपेक्षित आणि स्वागतार्हच. मात्र अयोग्य आणि बेजबाबदार उपयोग म्हणजे संशोधनातून प्राप्त संक्रमणाचे रूपांतर अतिक्रमणात होणे. याला आळा घालण्यासाठी ग्राहकांनी एकजुटीने आवाज उठवला पाहिजे. केवळ विक्रीच्या आकड्यावर लक्ष ठेवून ऑनलाईन पद्धतीने थेट ग्राहकाच्या पुढ्यात ढकलल्या जाणाऱ्या उत्पादनांना मोकळे रान मिळणार नाही, हे पाहणाऱ्या यंत्रणा ही सक्षम झाल्या पाहिजेत.

– वसुंधरा देवधर

MOFA दुरुस्ती ग्राहकांच्या हिताची नाहीच!

• ॲड. शिरीष देशपांडे, कार्याध्यक्ष

> बिल्डरांच्या लुटमारीला संरक्षण देण्यासाठी MOFA कायद्यात दुरुस्ती

मालकी हस्तांतरणाअभावी पुनर्विकास करू न शकणाऱ्या गृहनिर्माण संस्थांना मानीव हस्तांतरणाची (Deemed Conveyance) मोफा कायद्यातील सुविधा रेरा कायद्याअंतर्गत नोंदणी झालेल्या महारेराच्या गृहनिर्माण प्रकल्पांना सुद्धा लागू करण्याच्या नावाखाली महाराष्ट्र विधिमंडळाने घर खरेदीदारांची फसवणूक करणाऱ्या बिल्डरांना अभय देणारी मोफा कायद्यातील दुरुस्ती नुकतीच संमत केली आहे.

गृहखरेदीदारांच्या हक्कांचे रक्षण करणारा महाराष्ट्र फ्लॅट मालकी हक्क कायदा (MOFA) हा गेल्या अनेक दशकांपासून एक महत्त्वाचा कायदा ठरला आहे. या कायद्यामुळे बांधकाम विकासकांवर नियंत्रण ठेवले गेले आणि ग्राहकांना न्याय मिळविण्याचे एक प्रभावी साधन उपलब्ध झाले. मोफा कायद्यातील कलम १३ नुसार एखाद्या बिल्डरने घर खरेदीदाराची आर्थिक फसवणूक केल्यास त्याला ३ ते ५ वर्षाच्या कारावासाची तरतूद होती. परंतु या दुरुस्तीद्वारे महारेरामधे नोंदणी झालेल्या गृहप्रकल्पातील कोणत्याही विकासाने यापुढे घर खरेदीदारांची आर्थिक फसवणूक केल्यास त्याच्याविरुध्द मोफा कायद्यातील कलम १३ नुसार यापुढे फौजदारी कारवाई करता येणार नाही. याहूनही धक्कादायक बाब म्हणजे ही दुरुस्ती १ मे २०१७ पासून पूर्वलक्षी प्रभावानुसार अमलात आणली जात आहे. त्यामुळे महारेरातील नोंदणीकृत प्रकल्पातील विकासकांनी आजवर केलेल्या सर्व आर्थिक गुन्ह्यांना या

दुरुस्तीद्वारे चक्क माफी देण्यात आली आहे आणि सर्वात संतापजनक बाब म्हणजे अशा या दूरगामी परिणाम असलेल्या आणि गुन्हेगारांना पाठीशी घालणाऱ्या मोफा कायद्यातील दुरुस्तीला विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात कोणतीही चर्चा न होता संमती देण्यात आली आहे.

सदर MOFA दुरुस्तीमुळे ग्राहकांच्या हिताला गंभीर धोका निर्माण झाला आहे.

सदर दुरुस्तीबाबत मुख्य आक्षेप खालीलप्रमाणे:

१. **लोकसहभागाचा अभाव:** या विधेयकावर नागरिकांच्या सूचना किंवा आक्षेप मागवले गेले नाहीत. लोकशाही प्रक्रियेत लोकांचा सहभाग महत्त्वाचा असतो, पण या दुरुस्तीमध्ये तो पूर्णपणे दुर्लक्षित करण्यात आला आहे.

२. **MahaRERA नोंदणीकृत प्रकल्पांना MOFA तील फौजदारी गुन्ह्यांच्या तरतुदी लागू नाही:** सदर दुरुस्तीमुळे MahaRERA मध्ये नोंदणीकृत प्रकल्पांना MOFAतील फौजदारी गुन्ह्याबाबतच्या तरतुदी लागू राहणार नाहीत. फक्त 'Deemed Conveyance' सारखे काही अपवाद वगळता, गृहखरेदीदारांना MOFA अंतर्गत संरक्षण मिळणार नाही.

३. **गुन्हेगारी जबाबदारीतून सूट:** सर्वात गंभीर बाब म्हणजे, मोफा कलम १३ अंतर्गत बिल्डरांविरुध्द फसवणूक, आर्थिक गैरव्यवहार, विश्वासघात यांसारख्या गुन्ह्यांसाठी या पुढे फौजदारी खटला दाखल करता येणार नाही. यामुळे ग्राहकांच्या कष्टाने कमावलेल्या पैशाचे संरक्षण कमकुवत होईल आणि बिल्डरांच्या मनमानीला मोकळे रान मिळेल.

४. **पूर्वलक्षी प्रभावानुसार लागू होणारी दुरुस्ती:** या दुरुस्तीला १ मे २०१७ या मागील तारखेपासून (म्हणजे जेव्हापासून रेरा अंमलात आला तेव्हापासून) लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे त्या संपूर्ण काळात MOFAचे उल्लंघन करून ज्यांच्यावर गुन्हे दाखल झाले आहेत, अशा बिल्डरांना प्रत्यक्षात संपूर्ण माफी मिळणार आहे.

ग्राहकांसाठी विपरीत परिणाम:

- गृहनिर्माण क्षेत्रातील असुरक्षितता वाढणार
- घर खरेदीदारांना न्याय मिळविण्याचे एक प्रभावी साधन निष्प्रभ.
- कायद्याचा वचकच अशाप्रकारे काढून घेतल्याने ग्राहकांची फसवणूक करण्यास प्रोत्साहनच मिळेल.
- गृहखरेदीदारांचा गृहनिर्माण क्षेत्रातील विश्वास डळमळीत होईल.
- लोकांचा लोकशाही प्रक्रियेवरील विश्वासच उडून जाईल.

MOFA मधील कलम १३ हे घर खरेदीदारांसाठी एक प्रभावी असे संरक्षक कवच होते. त्याला निष्प्रभ करून, आणि चक्क पूर्वलक्षी प्रस्तावानुसार लागू करून, या दुरुस्तीने ग्राहकांच्या हिताला गंभीर इजा पोचवली आहे.

त्यामुळे सदर वादग्रस्त विधेयक राज्यपालांनी त्यावर स्वाक्षरी न करता विधिमंडळाकडे परत पाठवून, प्रथम लोकांचे मत जाणून घेणे आणि नंतर सखोल चर्चा करूनच पुढे नेणे आवश्यक आहे अशी मागणी मुंबई ग्राहक पंचायतीने मा. राज्यपालांकडे एका पत्राद्वारे केली असून याबाबत त्यांच्या प्रत्यक्ष भेटीचीही विनंती केली आहे. ♦

ग्राहक न्यायासाठी अनेक संस्था एकत्र

देशभरातील ग्राहकसंबंधी न्यायालयांमध्ये ५.७४ लाखांहून अधिक तक्रारी प्रलंबित आहेत. त्यातील ७० हजारांहून अधिक तक्रारी या एकट्या महाराष्ट्रातील आहेत. त्यांचा निर्णय लागण्यास प्रचंड विलंब होत असतो. त्यामुळेच ग्राहक संरक्षण कायदा व न्यायालयांच्या कार्यपध्दतीत आमूलाग्र बदलांची गरज ग्राहक क्षेत्रातील संघटनांनी नुकत्याच मुंबईत झालेल्या चर्चासत्रात व्यक्त केली. मुंबई ग्राहक पंचायतीने आयोजित केलेल्या या चर्चासत्रात 'अखिल भारतीय ग्राहक पंचायत' व 'ग्राहक पंचायत, महाराष्ट्र' यांचाही सहभाग घेतला होता.

ग्राहक न्यायालयांच्या आर्थिक कक्षा आणि निकष बदलून मागितलेली एकूण नुकसान भरपाई पाच कोटी रुपयांपर्यंत असल्यास ती तक्रार जिल्हा आयोगाकडे, पाच कोटी रुपयांहून अधिक आणि दहा कोटी रुपयांहून अधिक राज्य आयोगाकडे रकमेच्या तक्रारी राष्ट्रीय आयोगात दाखल करण्याची सुधारणा करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

आज ग्राहक आयोगात सर्वाधिक २४.५९ टक्के तक्रारी या विमा क्षेत्रातील आहेत. बहुतांश तक्रारी या व्यापारी कंपन्यांच्या असतात. अशा कंपन्यांचे विम्याचे दावे हे गुंतागुंतीचे आणि मोठ्या रक्कमांचे असल्याने अशा तक्रारींच्या सुनावणीला बराच वेळ लागतो. त्याचा

परिणाम सर्वसामान्य ग्राहकांच्या इतर प्रलंबित तक्रारींवर होतो आणि त्यामुळे ग्राहक न्यायालयातील विलंब काळ आणखी वाढण्यास मदत होते. या पार्श्वभूमीवर व्यापारी क्षेत्रातील कंपन्यांच्या विमाविषयी तक्रारी ग्राहक संरक्षण कायद्याच्या कक्षेतून वगळण्यात याव्यात, अशीही मागणी करण्याचे ठरले.

कोणत्याही पक्षकाराला केवळ अत्यंत अपवादात्मक परिस्थितीतच पुढची तारीख देण्यात यावी. दोनपेक्षा अधिक तारखा देण्यात येऊ नयेत तसेच, तारीख देताना दुसऱ्या पक्षाला त्याची योग्य ती आर्थिक भरपाई देण्यात यावी व याबद्दल कठोर तरतूद करण्यात यावी, या मागणीवरही उपस्थितांचे एकमत झाले. तक्रार निवारणासाठी कठोर कालमर्यादेसह तक्रार दाखल करून घेण्यासाठी १५ दिवस, विरुध्द बाजूचा जबाब दाखल करण्यासाठी ३० अधिक १५ दिवस, तक्रारदाराचा प्रतिजबाब दाखल करण्यासाठी १५ दिवस आणि दोन्ही बाजूंचे लेखी युक्तिवाद सादर करणे तसेच, सुनावणीनंतर निकाल जाहीर करण्यासाठी १५ दिवस, अशा बंधनांची मागणीही यावेळी करण्यात आली.

या चर्चासत्रात मुंबई ग्राहक पंचायतीचे कार्याध्यक्ष ॲड. शिरीष देशपांडे, कार्यवाह अनिता खानोलकर, कार्योपाध्यक्षा अनुराधा देशपांडे, ॲड. पूजा जोशी-देशपांडे, अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे अध्यक्ष सूर्यकांत पाठक, विजय सागर, वीणा दीक्षित, 'ग्राहक पंचायत, महाराष्ट्र'चे अध्यक्ष डॉ. विजय लाड, ॲड. सुरेंद्र सोनावणे, सचिव अरुण वाघमारे आदींचा सक्रिय सहभाग होता.

♦

माझाही खारीचा वाटा!

• मंगला गाडगीळ

“ गोष्टी काय फक्त मुलांनाच आवडतात? मोठ्यांनाही आवडतात की! ग्राहक म्हणून आपल्याला काही सांगणाऱ्या, सुचवणाऱ्या गोष्टींचे हे रंजक सदर– ”

रिडेव्हलपमेंट नंतर साफल्य सोसायटीतील रहिवासी नवीन घरात राहायला आले होते. बिल्डिंग नवीन असल्याने सोयीसुविधाही नवीन आणि आधुनिक होत्या. त्यातीलच एक म्हणज गच्चीवरील छोटासा बगीचा आणि त्यात बसण्याची व्यवस्था. जुने रहिवासी एकमेकांना बरीच वर्षे ओळखत असल्यामुळे ते हमखास सर्वजण संध्याकाळी गप्पाटप्पा करण्यासाठी एकत्र गच्चीवर जमत असत. त्यांच्यात बऱ्याच वर्षांचा घनिष्ठ घरोबा असल्याने त्यांना एकमेकांच्या आवडी आणि सवयी माहित होत्या. बहुतेक सर्वजण आता सिनियर सिटीझन होते.

जानेवारीच्या अगदी थंडीत जरी नाही तरी गारव्यात सगळे मजेत गप्पा मारत होते. नाना पंडितांना वत्सला मावशींची फुलांची आवड माहित होती. त्या नेहमी केसात गजरा माळायच्या. ते म्हणाले, ‘‘मावशी, सोसायटीतील रिडेव्हलपमेंटमध्ये वाचलेले आपले बकुळीचे झाड आता डवरले आहे बरं! सकाळी नातवाला स्कूल बसमध्ये सोडल्यानंतर बकुळीची फुले तुम्ही वेचू शकाल.’’

दिनकर दिवाण उर्फ डीडी म्हणाले, ‘‘बकुळीची फुले गोळा करणार असालच तर आपल्याच सोसायटीतल्या गणपतीला लक्ष वाहण्याचा नेम करा.’’

‘‘गुड आयडिया.’ त्यानंतर त्यांचं उद्यापन करा. आम्हाला जेवायला बोलवा. अगदीच काही नाही तर तुमच्या हातच्या गूळपोळ्या खिलवा.’’

वत्सला मावशी म्हणाल्या, ‘‘आत्ता कुठे? लक्ष वाहण्याचा नेम श्रावणात करतात.’’

‘‘श्रावणच कशाला पाहिजे? जानेवारीत करा. संक्रांतीच्या निमित्ताने संक्रमण म्हणजे बदल करतच असतो आपण. या वर्षी असा बदल करा. नाहीतरी नवीन वर्षात सर्वजण काही तरी संकल्प सोडतातच.’’

‘‘ठीक आहे. तशाही मी तुम्हाला गुळाच्या पोळ्या नक्की देईन.’’

‘‘अमृततुल्य, नवीन वर्षाचा संकल्प तुम्ही केला असेलच.’’ काळे काकांचे चहा प्रेम सर्वांना माहित असल्याने त्यांना सर्वजण अमृततुल्य म्हणत असत. ‘‘अमृततुल्य, तुम्ही काय केलाय संकल्प?’’ ‘‘मी? मी या वर्षी योगा क्लासेस जॉईन करणार.’’

सर्वांना हसू फुटले. पाटकर वहिनींसकट सर्वजण म्हणाले, ‘‘मागच्या वर्षी तुम्ही हाच संकल्प केला होतात. पुढे काय झालं? दोन महिन्यात ‘योगा मॅट’ माळ्यावर गेली.’’

‘‘नाही, त्याचं काय झालं, माझी पाठ दुखायला लागली, म्हणून’’ अमृततुल्य ओशाळून म्हणाले. ‘‘काही सांगू नका. आळशीपणा वाढलाय. सारखा चहा ढोसायला हवा,’’ इति मंदा काळे, त्यांची बायको धुमसली.

मग कोणी नातीच्या अभ्यासाची जबाबदारी, कोणी दर महिन्याला एक पुस्तक वाचून काढणे असे आपापले संकल्प सांगत होते.

‘‘मी आता रिटायर झालोय. मी दर महिन्याला आपल्या वाटपाचे सामान उतरवून घ्यायला मदत करेन आणि वाटपही करेन;’’ डीडी म्हणाले. ‘‘काकूंचे काम जरा हलकं करीन म्हणतो.’’ मंदाताई हसत हसत उद्गारल्या, ‘‘डीडी, तुम्हाला तूरडाळ आणि चणाडाळ यातला फरक समजतो का? वाटपाचा गोंधळ वाढवून ठेवाल. वस्तू कोणाकडे गेलीय ते शोधता शोधता पुरेवाट व्हायची.’’ तेवढ्याच स्पोर्टींगली घेत डीडी उत्तरले, ‘‘तुम्ही आहात की शिकवायला. तुम्ही सांगाल त्याप्रमाणे करेन. शिकेन हळूहळू.’’

‘‘आपला संघ तर उत्तम रीतीने पुन्हा चालू झाला

आहे ही चांगलीच गोष्ट आहे. पण एवढ्यावरच आनंद कसा मानायचा? इथे थांबता येणार नाही. पूर्वी आपल्या संघात ११ मेंबर होते. तीन मेंबर घर विकून गेलेत. आता आठच राहिले आहेत. मेंबर वाढवण्यासाठी काहीतरी केलं पाहिजे.''

''आपण सर्वांनी मिळून हाच संकल्प सोडला तर? न्यू इयर्स रेझोल्यूशन. प्रत्येक सभासदाने आणखी एक मेंबर संघात आणायचा.''

हो हो म्हणत सर्वांनी दुजोरा दिला.

''शेजारच्या सोसायटीत काही लोक माझ्या ओळखीचे आहेत. त्यापैकी कोणी मेंबर होऊ शकतो का ते बघतो,'' अमृततुल्य म्हणाले.

''सोसायटीच्या बाहेरचे सभासद नको रे बाबा!'' पाटकर वहिनी पटकन म्हणाल्या.

''का हो? ती काय माणसं नाहीत?'' इति नाना पंडीत.

''तसं नाही, पण त्यांच्या पिशव्या, सामानाची जबाबदारी घ्यावी लागेल. ती मंडळी सामान घ्यायला येईपर्यंत थांबावे लागेल. सुरुवातीला तर पैशाची जबाबदारीही घ्यावी लागेल.''

''संघ प्रमुख म्हणून मी ती जबाबदारी घेईन. नाहीतरी आजकाल संघाचं म्हणून काय काम असतं? वजन करत बसायला नको, NACH मुळे पैसे गोळा करून बँकेत भरायला नको. सगळं सोप्प झालंय. शिवाय आपली एमजीपी आणि सभासद यांच्यातला दुवा आहे मी,'' नाना पंडित अभिमानाने उद्गारले.

नाना पंडित पुढे म्हणाले, ''त्याचं काय आहे, या नवीन मंडळींचं सामान बघून आणखीही काही सभासद मिळू शकतील. जास्त सभासद झाले तर बरंच होईल. त्यांचा वेगळा संघ सुरू करता येईल.''

वत्सला मावशी म्हणाल्या, ''असं झालं तर फारच छान होईल.''

''आणखी काय करता येईल? आपल्या शेजारच्या बिल्डिंगमध्ये पॉलीक्लिनिक आहे. तिथे आपले मासिक ठेवता येईल. तिथे येणारे पेशन्ट चाळतील. निदान त्यांना अशी काही संस्था ग्राहकांच्या हिताचं काम करतेय एवढं तरी कळेल.''

''हो, हो मी पण लायब्ररीत आपला मासिक अंक ठेवीन. शिवाय आपल्या सोसायटीत आनंद मेळ्याच्या किंवा ग्राहक दिनाच्या दिवशी एक स्टॉल ठेऊ. तिथे आपली उत्पादने बघायला मांडून ठेऊ. पिठं, ड्रायफ्रुट अशा कितीतरी वस्तू ठेऊ शकू. त्यांचा दर्जा बघितल्यावर ते मेंबर होऊ शकतील.''

नाना पंडित पुढे म्हणाले, ''तुम्हाला आठवतंय का? मागे एमजीपीने एक छान 'नारा' दिला होता – एकच लक्ष्य – एक लक्ष. आपल्याला सभासद संख्या लाखावर न्यायची आहे. आपणही आपला त्यातला खारीचा वाटा उचलू या. एमजीपीची ताकद वाढवू या.''

मंडळी, आपण सर्वचजण एमजीपीचे मेंबर आहोत. आपल्या संस्थेची ताकद वाढवायची असेल तर सभासद संख्या वाढायलाच हवी. सभासदांच्या सोयीसाठी संस्था बरेच बदल करत आहे. उदा. ऑनलाईन संघ वगैरे. संकल्प सोसायटीतील संघाच्या सभासदांनी जसा नवीन वर्षाचा सभासद वाढवण्याचा संकल्प केला, तसा आपण सर्व सभासद या वर्षी हाच संकल्प करूया. संघ संवर्धन आणि संघ/सभासद वाढ करूया! ♦

प्रतिसाद

ग्राहक दिवाळी अंक मस्त

ग्राहक दिवाळी अंक ऑक्टोबर २०२५ छोटासा पण मस्त होता. मुखपृष्ठावरची फुलांची रांगोळी अगदी साधी पण सुंदर. त्यातील पणत्यांचा उजेड जास्त तेजस्वी!

नवदुर्गा २०२५ सन्मानित सर्व ग्राहक कार्यकर्त्यांचे अभिनंदन व शुभेच्छा.

'दिव्या दिव्या रे दीपत्कार' हा शोभा नाखरे यांचा लेख अगदी काव्यमय, चित्रमय होता. ज्ञानदीपापर्यंत नेले त्यांनी. समाजभान ठेवणारा हा लेख संग्राह्य होता.

शिरीष देशपांडे देश-परदेशातील ग्राहकांनाही परिचित आहेच. त्यांच्यासारख्या वकिलाकडून फसवणूक करणाऱ्या बिल्डरला अभ्यासून दणका मिळणारच. त्याबद्दल सविस्तर वाचल्यावर त्यांची व सर्वांची मेहनत किती आहे ते कळले. त्यांचा नागालँडचा अनुभव मस्त. पाककला स्पर्धा विजेत्यांचे पदार्थ नाविन्यापूर्ण व सोपे वाटले. मुख्य म्हणजे ग्राहकच्या सामानापासून केलेले हे वैशिष्ट्य.

वृषाली आठल्ये व त्यांच्या मैत्रिणींनी गणेशाची पर्यावरणस्नेही पाहणी केली. त्यांचे अनुभव तसेच गणपती कार्यशाळा, आपले विविध कार्यक्रम, सर्व वाचनीय.

एरवी पण दर महिन्याचा अंक उत्तम असतो. ते करणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांचे अभिनंदन.

– मंगला नातू

MGP निर्मित UN IGE on Consumer Protection ची गौरवशाली दशकपूर्ती

• **ॲड. शिरीष वा. देशपांडे,** कार्याध्यक्ष

राष्ट्रीय ग्राहक दिनाच्या जरा आधीचा, २२ डिसेंबर हा दिवस आपल्यासाठी महत्त्वाचा! १० वर्षांपूर्वी, २२ डिसेंबर २०१५ रोजी, संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेने ग्राहक संरक्षणासाठीच्या संयुक्त राष्ट्र मार्गदर्शक तत्त्वांमधे (UN Guidelines for Consumer Protection - UNGCP, १९८५ मधे) महत्त्वपूर्ण सुधारणा आणि करणारा ठराव सर्वसहमतीने मंजूर केला.

२२ डिसेंबर २०१५ रोजी मंजूर झालेल्या या सुधारीत UNGCP ची अंमलबजावणी संयुक्त राष्ट्रांच्या सदस्य राष्ट्रांमध्ये प्रभावीपणे होण्यासाठी एक कायमस्वरूपी देखरेख यंत्रणा स्थापन करण्यात यावी ही आपण केलेली महत्त्वपूर्ण सूचनासुध्दा स्विकारण्यात आली. ही यंत्रणा Intergovernmental Group of Experts - IGE on Consumer Protection म्हणून ओळखली जाते. ही आपण मुंबई ग्राहक पंचायतीने (MGPने) केलेल्या मूळ सुचनेतून साकारलेली संकल्पना असून जगभरातील ग्राहकांना MGP कडून मिळालेली ही एक कायमस्वरुपी मौल्यवान भेट आहे.



UN Guidelines मध्ये आपला हा प्रस्ताव समाविष्ट करून घेणे सोपे नव्हते. यासाठी संयुक्त राष्ट्रांच्या पातळीवर २०१२ ते २०१५ अशी सलग ३ वर्षे प्रदीर्घ चर्चा झाली, वादही झाले. Advocacy करावी लागली. अमेरिका, ब्रिटन, ऑस्ट्रेलिया यांसारख्या प्रभावशाली सदस्य राष्ट्रांकडून जोरदार विरोधही झाला. मात्र अखेर आपण यशस्वी ठरलो. यात मला माझ्या सहकारी शुभदा चौकर आणि वर्षा राऊत यांचे खूप पाठबळ लाभले, ज्यामुळे हे यश मिळवणे शक्य झाले.

आपला हा IGE चा प्रस्ताव प्रदीर्घ चर्चेनंतर संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेकडे पाठवण्याचे अंक्टाडच्या सभेत सर्व सहमतीने ठरवण्यात आले त्यावेळी सुध्दा आमच्या अमेरिकन मित्राने ''हे IGE म्हणजे नक्की काय असणार आहे?'' अशी विचारणा केली होती आणि मला आठवतंय अंक्टाडच्या संचालकांनी त्यावेळी घोषित केले होते की ''This IGE will be a Jewel in the Crown of UNCTAD. It will be a Game Changer'' आज १० वर्षांनंतर हे उद्‌गार खरे ठरल्याचे सर्व संबंधित मान्य करतील.

मला अभिमानाने सांगावेसे वाटते की, या १० वर्षांच्या कालावधीत MGP ने संयुक्त राष्ट्रांच्या IGE च्या वार्षिक परिषदांमध्ये सक्रिय सहभाग घेतला आणि Global On-line Dispute Resolution, ई-कॉमर्स, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) यांसारख्या ग्राहक हिताच्या विविध विषयांवर महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.

या दशकातील संपूर्ण प्रवासात माझ्या सर्व MGP सहकाऱ्यांनी मला भरभरून सहकार्य व मोलाचे योगदान दिले. ते सर्व औपचारीक आभाराच्या पलीकडले आहे. या माझ्या MGP टीममध्ये शुभदा चौकर, वर्षा राऊत, वसुंधरा देवधर, शर्मिला रानडे, डॉ. अर्चना सबनीस, ॲड. पूजा जोशी-देशपांडे आणि अनुराधा देशपांडे यांचा समावेश आहे. MGP चे सर्व पदाधिकारी, कार्यकारिणी सदस्य यांनीही माझ्यावर आणि माझ्या टीमवर संपूर्ण विश्वास दाखवल्याने हे सर्व शक्य झाले, याचा या प्रसंगी मी कृतज्ञतापूर्वक उल्लेख करू इच्छितो.

MGP चे हे अद्वितीय जागतिक योगदान आपल्या सर्वांनाच नव्हे तर प्रत्येक भारतीयाला अभिमानास्पद आहे. यापुढे सुध्दा जागतिक स्तरावरील आपली ही वाटचाल अशीच जोमाने चालू राहील अशी आशा आहे. ♦

बालदूत

आपण फिट, मैत्री हिट!

• **नेहा जोशी**

> **आपल्या घरातील बालग्राहकांसाठी हे खास सदर. लहानांनी हे वाचून मोठ्यांशी चर्चा करावी किंवा मोठ्यांनी लहानांना वाचून दाखवत गप्पा माराव्या, असे लेख या सदरात असतील.**

हॅलो छोट्या दोस्तांनो, मी तुमची नेहाताई! या महिन्यापासून रोज दर महिन्याला मी तुमच्या भेटीला या आपल्या खास ‘बालदूत’ सदरातून येणार आहे. यात मी तुम्हाला छोट्या गमतीजंमती, गोष्टी, माहिती सांगणार आहे. ही आपली गंमतजंमत तुम्ही कशी केलीत, त्यातून काय शिकलात, हे तुमच्या ताई-दादांना, आई-बाबांना, मित्रमैत्रिणींना, आजी-आजोबांना, शेजाऱ्यांना सांगायचं. तुम्ही आहात बाल‘दूत’ ...संदेशवाहक!

आता जानेवारी महिन्यात संक्रांत हा सण येतो. तुमच्यापैकी बरेच जण पतंगोत्सव साजरा करत असाल. घरी तुमची आई, आजी तिळगूळ, खमंग गुळाची पोळी करत असेल. घरी, सोसायटीमध्ये हळदीकुंकू समारंभ होत असतील. संक्रांतीला काही जण आपल्या शेजारी, सोसायटीमध्ये एकमेकांकडे जाऊन तिळगूळ, हलवा वाटतात. तिळगूळ देताना म्हणतात, ‘‘तिळगूळ घ्या आणि गोड गोड बोला.’’

का बरं वाटत असतील तिळगूळ माहिती आहे तुम्हाला?

तिळाच्या छोट्याशा दाण्यात बघा काय काय सामावले आहे - तांबे, मँगेनीज, कॅल्शियम, मॅग्नेशियम, आयर्न, फॉस्फरस, व्हिटॅमिन बी १ आणि बी ६, थायामीन फॉलेट, नायासिन, झिंक, मॉलिब्डेनम, सेलेनियम तसेच सिसॅमिन व सिसॅमोलीन हे दोन अत्यंत दुर्मीळ पोषक घटक या तिळाच्या टीचभर दाण्यात असतात. ते रक्तदाब आणि कोलेस्टेरॉल कमी करणारे तसेच इ व्हिटॅमिन देणारे आहेत. गुळात देखील आयर्न व अनेक व्हिटॅमिन्स असतात. त्यामुळे या थंडीच्या दिवसात आवश्यक असणारी उष्णता आणि गोडवा पण तिळगुळातून मिळतो. दुसरे उष्णता म्हणजे ऊब, माया! त्यामुळे परंपरस्परांमधील स्नेह (म्हणजे फ्रेंडशिप) वाढते.

म्हणजे तिळगूळ खाल्याने व दिल्याने आरोग्य पण फिट आणि मैत्री पण हिट! म्हणूनच ‘एक तीळ सात जणांनी वाटून खावा’ असाही वाक्प्रचार आहे. याचाच अर्थ ‘शेअरिंग इज केअरिंग’.

मग या संक्रांतीला सगळ्यांना तिळगूळ वाटायला जाल ना तुम्ही? मला खात्री आहे तुम्ही आईला तिळगूळ करायला आणि संक्रांत साजरी करायला नक्की मदत कराल. काय काय नक्की कराल?

- सक्रांतीसाठी हलवा आणताना पांढरा हलवाच घ्या. रंगीत हलव्यात घातक रसायनयुक्त फूड रंग वापरला असण्याची शक्यता असते. त्यामुळे रंगीत हलवा टाळा.

चित्र सौजन्य - AI ChatGPT

वस्तूंपेक्षा घरी केलेले कंपोस्ट खत, रोपे किंवा बिया, खाद्य वस्तू लुटूया असे आईला सुचवा.

- तिळगूळ देताना छोट्या कागदी पाकिटाचा किंवा केळीच्या पानाचा वापर करा.
- जानेवारी महिन्यात हेमंत ऋतुकडून शिशिराकडे निसर्गाची वाटचाल चालू असते. त्यामुळे पानगळ भरपूर होते. हा पालापाचोळा, पडलेल्या काटक्या, वाळलेली लाकडे गोळा करून छान शेकोटी पार्टी तुम्हाला करता येईल. छोटीशीच करायची म्हणजेच धूर कमी होईल आणि तीही मोठ्यांच्या देखरेखीखाली. या शेकोटीमध्ये तुम्ही कांदे, रताळे, जांभळे कंद भाजून खाऊ शकता ...एकदम नैसर्गिक बारबेक्यु! शेकोटी नंतर जी राख उरते तिचा खत म्हणून वापर करता येतो. याच काळात ज्वारीचे, बाजरीचे नवीन पीक येते. या कोवळ्या दाण्यांना हुरडा म्हणतात. तो जरूर खा. कोवळा हरभरा, बोरे, पेरू, ऊस असा रानमेव्याचा बहर पण याच ऋतूत येतो. त्याच्या फडशा पाडा.
- पतंग उडवणार असाल तर काचयुक्त मांजा घेऊ नका. त्यामुळे पक्ष्यांना इजा पोचू शकते. गच्चीत खेळताना तुम्ही तुमची, मित्रांची काळजी घ्या. मोकळ्या जागेवर पतंग उडवा.
- आई हळदी कुंकू करणार असेल तर ते पर्यावरणपूरक पध्दतीने करायला आईला मदत करा. प्लास्टिकच्या
- संक्रांतीच्या आदल्या दिवशी भोगी असते, त्या दिवशी मस्त बोरे, गाजर, घेवडा, मटार दाणे, ताजे हिरवे हरभरे अशी मिक्स भाजी, मुगाच्या डाळीची खिचडी आणि बाजरीची भाकरी त्यावर मस्त लोण्याचा गोळा असा पोषक आहाराचा बेत केला जातो. धुंधुरमास असे या काळाला संबोधले गेल्यामुळे या खाण्याला 'धुंधुरमास मेजवानी' असेही आपण म्हणू शकतो. आपल्या मातीत पिकलेली फळे, भाज्या, धान्य त्या त्या ऋतूत खाल्ले की आपोपच आपण शाश्वत जीवनशैलीकडे झुकतो. शिवाय आरोग्य पण सुरक्षित राहते. आहे ना विन विन सिचुएशन?

तुम्ही संक्रांतीला यातली काय काय मजा केलीत ते नक्की कळवा.

– तुमची नेहाताई

orchidrose2011@gmail.com

बोरीवली विभागाच्या औदुंबर छाया संघाच्या सभासद सुनिता जगदिश मोरे यांची कन्या डॉ. श्रुती मोरे भारद्वाज (सॅम्पिया फाउंडेशनच्या संस्थापिका) यांनी दिव्यांग मुलांसाठी केलेल्या अतुल्य योगदानाबद्दल त्यांना ३ डिसेंबर २०२५ रोजी भारत सरकारने राष्ट्रपती श्रीम. द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते राष्ट्रीय पुरस्कार देऊन सन्मानित केले. अभिनंदन डॉ. श्रुती.

नवीन संघांचे स्वागत

मुंबई	सिंधू ग्राहक संघ	३१२२७ BO	सभासद ७
ठाणे	सृष्टी ग्राहक संघ	१५६९३ TN	सभासद १२
ठाणे	सत्यजीत ग्राहक संघ	१५६९४ TN	सभासद १३

बालग्राहकांची उत्साही फौज

• शुभदा चौकर

गोरेगावातील अ. भि. गोरेगावकर शाळेतल्या consumer club उपक्रमातील मुलांनी शाळेच्या मैदानावर मातीत मनमुराद रमून ७ किल्ले साकारले. सुमारे ८०-९० मुले सहभागी झाली होती. मुंबई ग्राहक पंचायतीतर्फे शाळेतील सातवीच्या मुलांसाठी सजग ग्राहकत्वाचे वर्ग घेतले जातात. या मुलांसाठी ग्राहक शिक्षणाचा वर्ग चालवताना आपली कार्यकर्ती नेहा जोशी अनेक उपक्रम घेत असते. पर्यावरणप्रिय उत्सव कसे साजरे करावे, याचा एक नमुना म्हणून नेहाताईने त्यांना किल्ले साकारण्याची कल्पना गेल्या वर्षी शिकवली होती. यंदा दिवाळीच्या आधीच्या आठवड्यात पावसामुळे किल्ले साकारता आले नाहीत, याची रुखरुख भरून काढण्यासाठी हा उपक्रम २६ नोव्हेंबरला घेण्यात आला. मुलांना नेहाताईने सांगितल्याप्रमाणे त्यांनी माती, विटा, गोणपाट, जुनी कापडे, बाटल्या, डबे. सजावटीचे साहित्य असे बरेच काही गोळा केले. एकेका गटात ९-१० मुले असे सर्वांनी मिळून ७ सुंदर प्रतिकृती अवघ्या दीड-दोन तासांत साकारल्या.

या दिवशी किल्ले साकारण्याला निमित्त होते अभिमान ग्राहक जत्रेचे. अ भि. गोरेगावकर शाळेत २८, २९, ३० नोव्हेंबरला, शाळेच्या पालक गटाने अभिमान ग्राहक जत्रा भरवली होती. खाद्यपदार्थ, इमिटेशन ज्वेलरी, कापडे, खेळणी इत्यादी ग्राहकोपयोगी वस्तूंची दालने होती. त्यात एक लक्षणीय ठरलेले दालन म्हणजे- सजग ग्राहक दालन. तिथे या चुणचुणीत आणि प्रशिक्षित मुलांनी ग्राहक शिक्षणाचे दालन चालवले. नेहा जोशी, शुभदा चौकर आणि मंगला गाडगीळ यांनी या मुलांची थोडी तयारी करून घेतली. कोणताही पॅकबंद खाऊ घेताना काय लक्षात घ्याल, कूकर, तवा घेताना कोणते चिन्ह बघाल,

कंझ्युमर क्लबची मुले माहिती देताना.

अशी माहिती मुलांनी मोठ्यांना दिली. त्यासाठी सुंदर फलक केले. काही वस्तू, वेष्टने यांनी दालन सजलेले होते.

या ग्राहक दालनाला भेट दिलेले सर्व ग्राहक फार खुश झाले हे दालन बघून आणि मुलांच्या तोंडून इतकी उपयुक्त माहिती ऐकून. मुलांची तयारी आणि सांगण्याची उत्साही पद्धत बघून ग्राहक अचंबित होत होते. नेहा जोशी ते जत्रेचे तीन दिवस, किल्ले बांधणीच्या दिवशी आणि तत्पूर्वी मुलांना प्रशिक्षण देण्यासाठी कायम या मुलांसोबत होत्या.

आपण आपल्या ग्राहक पंचायत पेठांमध्ये ग्राहक शिक्षण देणारे दालन ठेवतो. पण दुसऱ्या संस्थेच्या ग्राहक पेठेत आपली ही शिकवण रुजवणे, हा प्रयोग आगळा होता.

या निमित्ताने प्रत्येक खरेदीचे बिल देणे, ही आपली प्रथाही राबवण्याचा प्रयत्न या अभिमान ग्राहक जत्रेत झाला. उचित प्रथेचा असा प्रसार झाला!

एकंदर ग्राहक शिक्षणाचा हा उपक्रम फारच छान झाला.

द नेचर लव्हर्स या संस्थेने आपल्या या उपक्रमाची दखल घेऊन ३० नोव्हेंबर रोजी नेहा जोशी यांना अ. भि. गोरेगावकर शाळेत बोलावून त्यांचा सत्कार केला.

♦

मुक्ता दाभोळकर, शलाका देशमुख, वैशाली रोडे
अ. भि.गोरेगावकर शाळेतील 'जागो ग्राहक' स्टॉलवर माहिती घेताना.



महिला पोलिस अधिकारी 'जागो ग्राहक' स्टॉलवर

मुलांच्या भल्यासाठी ऑस्ट्रेलियाचे दमदार पाऊल

• नेहा जोशी

“ १० डिसेंबरपासून ऑस्ट्रेलियाने १६ वर्षांखालील मुलांच्या सोशल मिडिया साईट्सच्या वापरावर बंदी लागू केली आहे. कायदा करून अशी बंदी घालणारा आणि नियमाचे पालन होईल याची जबाबदारी टेक–कंपन्यांवर टाकणारा ऑस्ट्रेलिया हा जगातील पहिला देश ठरला आहे. ”

‘‘This is a day when Australian families taking back power from these big technology companies and asserting right of kids to be kids and parents to have greater peace of mind.’’ असे उद्‌गार काढत ऑस्ट्रेलियाच्या पंतप्रधान अँथनी अल्बानीज यांनी एक महत्त्वपूर्ण निर्णय ऑस्ट्रेलिया सरकारने घेतल्याचे जाहीर केले. Online safety Amendment Act अंतर्गत १० डिसेंबरपासून ऑस्ट्रेलियाने १६ वर्षांखालील मुलांच्या सोशल मिडिया साईट्स (फेसबुक, ट्विटर, इन्स्टाग्राम, स्नॅपचॅट, एक्स, टिकटॉक अशा १० मोठ्या साईट्स) च्या वापरावर बंदी लागू केली आहे. कायदा करून अशी बंदी घालणारा आणि नियमाचे पालन होईल याची जबाबदारी घेणे टेक–कंपन्यांवर बंधनकारक करणारा ऑस्ट्रेलिया जगातील पहिला देश ठरला आहे.

या नवीन कायद्यानुसार, सोशल मीडिया कंपन्यांना आता ऑस्ट्रेलियातील १६ वर्षांखालील युजर्सची अकाउंट्स बंद करावी लागतील आणि नवीन अकाऊंट तयार करता येणार नाही. नियमांचे पालन न करणाऱ्या कंपन्यांना ४९.५ दशलक्ष ऑस्ट्रेलियन डॉलर. (साधारण २९० कोटी रुपये) पर्यंतचा मोठा दंड भरावा लागू शकतो.

चित्र सौजन्य – AI ChatGPT

सारे जग मुलांच्या सोशल मीडियाच्या बेसुमार वापराविषयी चिंतेत आहे. मुलांकडून होणाऱ्या सोशल मीडियाच्या वापरावर सरकारने बंदी आणावी की पालकांनी मुलांवर बंधने घालावीत, अशी चर्चा जगात सर्वत्र चालू असताना ऑस्ट्रेलिया सरकारने हा निर्णय घेतला. ऑस्ट्रेलियातील एका सर्व्हेक्षणानुसार दर तीन मुलांमागील एक मूल मानसिकरीत्या असंतुलित आढळून आले. तसेच तेथील e-safety कमिशनरकडे सायबर बुलिंगच्या पुष्कळ तक्रारी येऊ लागल्या. यामुळेच सर्व मोठ्या कंपन्यांचे दडपण झुगारून ऑस्ट्रेलिया सरकारने हे कठोर पाऊल उचलले.

या निर्णयाची अंमलबजावणी, समस्या आणि मतमतांतरे १० डिसेंबरला १६ वर्षांखालील मुलांची सोशल मीडिया अकाऊंट बंद झाली. मुलांना हे आधी माहित होते. त्यामुळे काही मुलांनी आधीच Goodbye मेसेज त्यांच्या अकाऊंटवर लिहून ठेवले होते.

ऑस्ट्रेलियन विचारवंतांच्या मते हा योग्य निर्णय असला तरी तो परिपूर्ण नाही. अजूनही ऑनलाईन गेमिंग साईट, AI चॅटबोट, डीप फेक यावर कोणतेही निर्बंध नाहीत. आता मुलांना सोशल मीडियापासून सक्तीने लांब केले आहे, पण गरज आहे ती मुलांना त्याची कारणे समजावून शहाणे करण्याची. कुठलीही सक्ती केली की आतील कुतूहल उफाळून वर येते. (Spring reaction). तसेच ऑस्ट्रेलियामध्ये घडू लागले आहे. काही मुलांनी हायलायटर्स वापरून आपण १६ वर्षांचे आहोत, हे दाखवत फेस व्हेरिफिकेशन केलेसुध्दा आहे. कारण हे तंत्रज्ञान अजूनही फूलप्रूफ नाही आहे.

ऑस्ट्रेलियामध्ये काही मुलांना आपला एखादा अवयव काढून घेतल्यासारखे वाटते आहे. ‘मोबाईल माझा सांगाती’ असे अनेक मुलांना वाटते. त्यामुळे काहीना एकटे वाटते. मोकळ्या वेळेचे करायचे काय हा प्रश्नही त्यांच्यापुढे आहे. त्यामुळे तिथे पालकांना बरोबर घेऊन याबाबत सरकारने पॉलिसी बनवावी, असा विचार जोर धरत आहे.

मुलांच्या सोशल मीडिया वापराबाबत भारतात कोणते नियम, अटी, निर्बंध असावेत असे तुम्हाला वाटते? आपले मुंबई ग्राहक पंचायतीचे अनेक संघ आहेत. या सांघिक पातळीवर एकत्र येऊन आपल्याला मुलांसाठी काय करता येईल? याबाबतीत आपल्या प्रतिक्रिया कृपया कळवाव्यात. येणाऱ्या पिढीची उत्तम जडणघडण व्हावी, या दृष्टीने आपण काय करू शकतो?
तुमच्या प्रतिक्रिया mgpgtm40@gmail.com या इमेलवर कळवा.

मुलांनी सतत मोबाइलवर 'स्क्रोल' करण्यापेक्षा 'ऑफलाईन' मजा करावी, एखादा नवा खेळ खेळावा, एखादे वाद्य वाजवायला शिकावे किंवा चांगले पुस्तक वाचावे, असे आवाहन तेथील पंतप्रधानांनी केले.

ऑस्ट्रेलिया व्यतिरिक्त स्वीडन आणि नॉर्वेमध्येही मुलांसाठी सोशल मीडियाच्या वापराबाबत कठोर नियम आहेत. नॉर्वेने संमती वय १३ वरून १५ पर्यंत वाढवण्याचा प्रस्ताव दिला आहे. युरोपीय युनियन (EU) मध्ये १६ वर्षांखालील मुलांसाठी सोशल मीडिया वापर बंद करण्यावर चर्चा आहे. हे नियम मुलांचे मानसिक आरोग्य आणि ऑनलाईन धोक्यांपासून संरक्षण करण्यावर केंद्रित आहेत, पण अंतिम कायद्यासाठी मात्र सखोल अभ्यास आणि संरक्षण तपशील आवश्यक आहेत, असे त्या देशातील तज्ज्ञांचे म्हणणे आहे.

भारतामध्ये मुलांचा पर्सनल डेटा वापरण्यावर बंदी आहे. परंतु मुलांच्या सोशल मीडिया वापरावर ठोस असे निर्बंध नाही. त्यामुळे मुलांच्या ऑनलाईन सुरक्षेसाठी भारतातील पालकांनी, शिक्षकांनी, मुलांची देखभाल करणाऱ्या व्यक्तींनी याबाबत आपली मते, भूमिका, सरकारकडून असलेली अपेक्षा मांडायला हवी. आपल्याकडे उपलब्ध असलेल्या कौटुंबिक मनुष्यबळामुळे मुलांना एकटेपणा जाणवण्याचा धोका कमी आहे. कुटुंबातील किंवा परिसरातील मोठ्यांनी मुलांबरोबर आळीपाळीने वेळ घालवणे, विविध उपक्रम राबवून त्यांच्यातील कलागुणांना वाव देणे, मुलांसाठी आनंद मेळावा, वाचन उपक्रम, कला कार्यशाळा, खेळ असे उपक्रम जाणीवपूर्वक करायला हवेत. ♦

महाराष्ट्र कॉलेज येथे प्रशिक्षण

• रंजना मंत्री

९ डिसेंबर २०२५ रोजी मुंबई सेंट्रल येथील महाराष्ट्र कॉलेज ऑफ आर्टस, सायन्स ॲण्ड कॉमर्स या कॉलेजच्या केमिस्ट्री डिपार्टमेंटतर्फे Food Analysis certificate course च्या अंतर्गत आयोजित केलेल्या Adulteration Awareness and Mitigation Strategy या ग्राहक जागरूकतेच्या कार्यक्रमाला मुंबई ग्राहक पंचायत, शिक्षण विभागातून रंजना मंत्री व ममता आठल्ये या कार्यकर्त्या मार्गदर्शक म्हणून सहभागी झाल्या होत्या.

विद्यार्थ्यांना दुधाच्या पिशवीचे परीक्षण कसे करावे व भेसळ कशी ओळखावी हे समजावून सांगताना रंजना मंत्री व ममता आठल्ये

या वेळी दुधात होणारी भेसळ, दुधाचे व दुधाच्या पिशवीचे परीक्षण कसे करावे, तसेच तिखट, हळद, चहा, कॉफी व इतर खाद्य पदार्थात होणारी भेसळ, रस्त्याच्या कडेने विकले जाणारे खाद्यपदार्थ व दूध न वापरता केले जाणारे पनीर, फ्रोझन डेझर्टसारखे पदार्थ कसे ओळखावे, काय काळजी घ्यावी हे सांगण्यात आले. त्याशिवाय खाद्यपदार्थांच्या बंद पाकिटावर नियमानुसार आवश्यक असणारी माहिती व ISI, मार्क, fssai मार्क, हॉल मार्क, ईको मार्क, CRS मार्क याबद्दल माहिती सांगून त्यातून ग्राहकांचे सुरक्षित राहणारे हक्क व BIS care app चा वापर कसा करावा या बाबतीत माहिती देण्यात आली. तसेच आपल्या संस्थेची थोडक्यात ओळख करून देण्यात आली.

एकंदर ५२ विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरवातीला प्रा. डॉ. निलिमा दिक्षित यांनी ओळख करून दिली. प्रा. डॉ. मयुरी जोशी यांनी प्रास्ताविक केले. प्रिन्सिपल डॉ. शिराजुद्दीन चौगले यांनी स्वागत केले, तसेच कार्यक्रमाच्या शेवटी प्रा. डॉ. जुलेखा शेख यांनी आभार मानले. ♦

ग्राहक विषयांवर वक्तृत्व स्पर्धा संपन्न

• **रंजना मंत्री**, संघटन विभाग प्रमुख

राष्ट्रीय ग्राहक दिनानिमित्त मुंबई ग्राहक पंचायत, संघटन विभागातर्फे सभासदांची मुले वा नातवंडे यांच्यासाठी खास वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेसाठी वय वर्षे ११ ते १५ या वयातील मुलांच्या स्पर्धेसाठी विषय होते–

१. मोबाईल गेम की मैदानी खेळ
२. माझा ग्राहक संघ
३. ऑनलाईन खरेदी, ऑफलाईन खरेदी
४. घरच्या खरेदीत माझा सहभाग

स्पर्धेची पहिली फेरी ऑनलाईन झाली. स्पर्धकांनी आधी त्यांनी निवडलेल्या विषयावरचा ३ मिनिटांचा व्हिडीओ बनवून पाठवावा, असे अपेक्षित होते. त्यानंतर या स्पर्धकांची दुसरी व अंतिम फेरी शनिवार, २० डिसेंबर रोजी ग्राहक भवन येथे आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत सहा भौगोलिक विभागांतील एकंदर १२ मुलांनी भाग घेतला.

वक्तृत्व स्पर्धेत मांडलेले मुद्दे व सादरीकरण हे स्पर्धेचे मुख्य निकष होते. स्पर्धकांच्या व्हिडीओचे परिक्षण बोरीवली भौगोलिक विभागाच्या अध्यक्षा डॉ. सुहासिनी संत यांनी केले आणि स्पर्धकांना सुधारणा करण्याच्या दृष्टीने काही सूचना केल्या.

स्पर्धेच्या अंतिम फेरीसाठी संस्थेच्या ज्येष्ठ कार्यकर्त्या, ग्राहक मासिकाच्या माजी संपादक व माजी शिक्षण विभाग प्रमुख वसुंधरा देवधर तसेच कार्यकारिणी सदस्य, तक्रार मार्गदर्शन केंद्र समन्वयक व महारेरा कन्सिलिएटर शर्मिला रानडे यांनी परीक्षक म्हणून जबाबदारी स्विकारली. तसेच दहिसर भौगोलिक विभागाच्या अध्यक्षा डॉ. सीमा सोनटक्के या कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित राहिल्या होत्या.

सर्व स्पर्धकांना सहभागाबद्दल प्रमाणपत्र देण्यात आली. त्यांच्या सादरीकरणानंतर संघटन विभाग प्रमुख, रंजना मंत्री यांनी स्पर्धकांना वाटपातून देण्यात येणारी चिक्की व कापडी पिशवी देऊन आपले आरोग्य व पर्यावरणाचे आरोग्य याचे महत्त्व सांगत स्पर्धकांशी संवाद साधला. स्पर्धेसाठी दिलेल्या विषयांमुळे मुलांच्या विचारांना चालना मिळाली, असे उपस्थित पालकांनी दाद देऊन सांगितले.

या स्पर्धेत मालाड विभागातील ९ वर्षे वयाची अहिता आलेख गांधी हिने स्पर्धेत भाग न घेताही उपस्थित राहून सादरीकरण केले. त्याबद्दल परिक्षकांनी तिचे खास कौतुक केले. स्पर्धेच्या शेवटी, दोन्ही परीक्षकांनी सर्व स्पर्धकांचे व त्यांच्या पालकांचे कौतुक व अभिनंदन करत स्पर्धेसाठी कोणत्या गोष्टींची काळजी घेणे गरजेचे आहे याबद्दल मार्गदर्शन केले. डॉ. सीमा सोनटक्के यांनी दोन बोधपर गोष्टी सांगितल्या. संपूर्ण कार्यक्रम अतिशय उत्साही वातावरणात पार पडला.

मागे उभे– सहभागी स्पर्धक. बसलेले डावीकडून परीक्षक शर्मिला रानडे, वसुंधरा देवधर, प्रमुख पाहुण्या डॉ. सीमा सोनटक्के आणि संघटन विभाग प्रमुख रंजना मंत्रीमागे उभे कार्यकर्ते उमा पावनगडकर आणि वृषाली आठल्ये आणि स्पर्धक

विजेत्यांचे अभिनंदन!

प्रथम क्रमांक : सई आशिष वैद्य (कांदिवली विभाग) ● **द्वितीय क्रमांक :** चिन्मयी अभिजीत ठाकूरदेसाई (मालाड विभाग)
तृतीय क्रमांक : यश महेश पाटील (दादर-माहिम-बांद्रा विभाग) ● **उत्तेजनार्थ :** सोहम योगेश सहस्त्रबुध्दे (चेंबूर-कुर्ला-घाटकोपर विभाग)
सर्व विजेत्याचे अभिनंदन आणि सहभागींचेही कौतुक.

प्रथम क्र. सई वैद्य

द्वितीय क्र. चिन्मयी ठाकूरदेसाई

तृतीय क्र. यश पाटील

उत्तेजनार्थ सोहम सहस्त्रबुध्दे

रंजना मंत्री यांनी सर्वांचे आभार मानले. शेवटी विघटनशील बाऊलमधून खाऊ व स्टीलच्या पेल्यातून कॉफी देऊन कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

सहभागी स्पर्धकांची नावे खालील प्रमाणे-

तनय प्रसाद पाटील (मालाड विभाग), अस्मि धनेश पाटील (दादर-माहिम-बांद्रा), तन्मयी अनिरुध्द गोडबोले (दादर-माहिम-बांद्रा विभाग), यश महेश पाटील (दादर-माहिम-बांद्रा विभाग), आराध्य अभिजीत दळवी (दादर-माहिम-बांद्रा विभाग), सिओना सागर घरत (विलेपार्ले विभाग) अक्षरा विकी मेहता (ठाणे विभाग), सोहम योगेश सहस्त्रबुध्दे (चेंबूर-कुर्ला-घाटकोपर विभाग), काव्या निखिल शिंगी (ठाणे विभाग), सई आशिष वैद्य (कांदिवली विभाग), हितिका आलेख गांधी (मालाड विभाग), चिन्मयी अभिजीत ठाकूरदेसाई (मालाड विभाग).

♦

नववर्षात नवीन ठिकाणी पंचायत पेठा

बघता-बघता २०२५ वर्ष सरले आणि २०२६ वर्षाची सुवर्ण किरणे दिसू लागली. २०२५ वर्षातील पंचायत पेठांनी खूप छान चित्र रंगवले. आता २०२६ वर्षाचे स्वागतसुध्दा ह्या धमाकेदार पंचायत पेठांनी आपण करत आहोत. परत एकदा तो उत्साह, तो खरेदीचा सोहळा, कार्यकर्त्यांचा अमाप उत्साह घेऊन नवीन वर्षाचे स्वागत करण्यास सगळेच उत्सुक आहेत.

ह्या नवीन वर्षाची सुरुवातच चेंबूर यथील पेठेच्या आयोजनाने होत आहे. जानेवारी महिन्यात ३ आणि फेब्रुवारी महिन्यात २ ठिकाणी पंचायत पेठांचे आयोजन होत आहे. ह्या एकंदर ५ पेठांच्या पंचफुल्यातील ३ पेठा नवीन ठिकाणी प्रथमच आयोजित होत आहेत.

पेण, बोईसर आणि रत्नागिरी येथे प्रथमच ह्या पेठांचे आयोजन होईल. नाविन्यपूर्ण उत्पादने नवीन कार्यकर्ते आणि नवीन कल्पना घेऊन हे आयोजन होत आहे. तर चेंबूर आणि पुणेचे अनुभवी कार्यकर्ते ह्या पेठा यशस्वी होण्यासाठी प्रचंड उत्साहाने कामाला लागले आहेत.

चला तर मंडळी ह्या सर्व उत्साहाच्या पालखीला तुमचाही हातभार लागलाच पाहिजे.

भरपूर प्रचार प्रसार करा, उत्साहाने खरेदी करा. इथे फक्त खरेदी विक्रीचा व्यवहार नाही, खोट्या जाहीरातींचा भूलभूलैया नाही. 'सुजाण' आणि 'सजग' ग्राहकत्वाचा अनुभव घेण्यासाठी इथे प्रत्यक्ष भेट देणे हेच आपले योगदान असेल.

मग भेटूया! आपल्या सोयीच्या ठिकाणी पंचायत पेठेत.

आगामी ग्राहक पंचायत पेठ वेळापत्रक – २०२६

१.	३ जानेवारी ते ७ जानेवारी २०२६	बालविकास संघ, गांधीमैदानाजवळ, चेंबूर, मुंबई	५ दिवस
२.	८ जानेवारी ते १२ जानेवारी २०२६	हर्षल हॉल, कर्वे रोड, कोथरूड, पुणे	५ दिवस
३.	१४ जानेवारी ते १८ जानेवारी २०२६	मराठा समाज भवन, छत्रपती संभाजी चौक, गणपती वाडी, पेण शहर	५ दिवस
४.	६ फेब्रुवारी ते १० फेब्रुवारी २०२६	PDS's Hall, TAPS colony, TAPS Post, Boisar	५ दिवस
५.	१३ फेब्रुवारी ते १७ फेब्रुवारी २०२६	मराठा भवन मंगल कार्यालय, जिल्हा परिषद जवळ, रत्नागिरी	५ दिवस

ग्राहक पंचायत पेठ दालन तक्ता - बोईसर, रत्नागिरी

क्र.	स्टॉलचे नाव	वैशिष्ट्ये	बोईसर	रत्नागिरी
१.	दिनेह कलेक्शन	सिको, गढवाल पैठणी, कॉटन इ. ५/९ वार साड्या	✗	✓
२.	अथर्व कलेक्शन	जामदानी, कोरा सिल्क साड्या, रेडिमेड ब्लाऊज	✗	✓
३.	वित्ताशी एंटरप्रायझेस	हॅण्ड ब्लॉक, अजरख प्रिंट साड्या	✗	✓
४.	सदाफुली	चंदेरी, सिल्क, हँण्डब्लॉक, लिनन, इक्कत, खण	✓	✗
५.	सोलरॅप	इरकल, कॉटन सिल्क, संबलपुरी, कशिंदा वर्क साड्या	✓	✓
६.	श्वेता कलेक्शन	कॉटन, टसर (बाटीक प्रिंट), सारीज	✓	✗
७.	सिमरन कलेक्शन्स	प्लाझो सेट, डिझाईनर कॉटन, रेयॉन कुर्तीज	✓	✗
८.	मोहक क्रिएशन्स	फॅन्सी कुर्तीज, कलमकारी, इक्कत रेडिमेड कुर्तीज	✗	✓
९.	नारी बुटिक	शॉर्ट अॅण्ड लाँग कुर्तीज् पुरुष व स्त्रियांसाठी शर्टस्	✗	✓
१०	स्पर्श क्रिएशन्स	सर्व प्रकारच्या लखनवी कुर्ती, पटियाला, प्लाझो, दुपट्टे	✓	✗
११.	वल्लरी फॅशन डिझायनर	डेनिमचे स्त्रिया, पुरुष व मुलांसाठीचे कपडे	✓	✓
१२.	कायरा कलेक्शन	लेगिंग, जॅकेट्स, सिल्क कुर्तीज	✓	✗
१३.	मयुरा कलेक्शन	शॉर्ट टॉप, स्लिव्हलेस टॉप, वनपीस स्पॅगेटी	✗	✓
१४.	नील क्राफ्ट	शॉर्ट टॉप, कॉटन कुर्तीज	✓	✓
१५.	अनुराधाज् कलेक्शन	महेश्वरी, प्युअर सिल्क, कॉटन ड्रेस मटेरिअल	✗	✓
१६.	रमा कलेक्शन	विविध प्रकारचे ड्रेस मटेरिअल	✓	✓
१७.	मायलेकी	बाटिक, जयपूर गाऊन्स	✓	✓
१८.	सजनी नाईटीज	विविध प्रकारचे गाऊन्स, नाईटी, हाफ गाऊन्स	✗	✓

१९.	पिपा क्रिएशन	फॅन्सी ब्लाऊज, स्कर्टस्	✓	✓
२०.	डी.टी. निटवेअर	बनियन्स, ट्रॅकसूट, टी शर्टस्, सॉक्स	✓	✓
२१.	भारतीय खादी सेंटर	लेंगे, झब्बे, शर्टस् पंचे, हातरुमाल, जॅकेटस्	✓	✓
२२.	अतरंगी टि शर्टस्	मराठी कॅलीग्राफिक टीशर्टस्	✓	✓
२३.	महाटेक्स	टॉवेल, सतरंज्या, दोहर, चादरी	✗	✓
२४.	आर.आर.क्रिएशन	सोलापुरी चादरी, जयपूरी दोहर, रजाई, दिवान सेट	✓	✓
२५.	ब्लॉक्स ॲण्ड बाटिक्स्	ब्लॉक प्रिंट, बाटिक बेडशीट्स, कुशन कव्हर्स	✓	✗
२६.	पल्लवी कव्हर्स	सोफा, फ्रीज हँडल, टॉप, मिक्सर, साडी कव्हर्स	✓	✓
२७.	मल्हार क्रिएशन्स	बाळाचे कपडे, दुपटी, टोपी, लहान मुलांचे कपडे	✗	✓
२८.	विकास लेदर वर्क्स	लेदर पर्सेस, पाऊच, लेदर जॅकेट, बेल्ट	✓	✓
२९.	उद्यमिता	महिला बचत गटांनी बनवलेल्या पर्सेस, फोल्डर्स	✗	✓
३०.	शितल बॅग्ज	प्रवासी बॅग्ज, पर्सेस	✓	✗
३१.	उर्जा गिफ्टस्	विविध प्रकारच्या फॅब्रिक बॅग्ज	✗	✓
३२.	ट्रॅडिशनल ऑर्नामेंटस्	इमिटेशन ज्वेलरी, आर्टिफिशल ज्वेलरी	✓	✓
३३.	श्री महालक्ष्मी आर्टस्	पारंपरिक व ॲण्टिक ज्वेलरी	✗	✓
३४.	फॅशन क्युरा ज्वेलरी	टेरा-कोटा ज्वेलरी, वुडन आणि फॅब्रिक ज्वेलरी	✓	✓
३५.	ब्लॉसम ॲण्ड इन्सेंस	परफ्यूम्स	✓	✓
३६.	अनुयोग इन्सेंस	विविध प्रकारची अत्तरे, सुगंधी अगरबत्ती	✗	✓
३७.	ज्ञासा ग्लास आर्टिफॅक्टस्	काचेचे दिवे, पूजा सेटस्, अत्तरदाणी	✗	✓
३८.	अखंडज्योत	टाळ, घंटी, झांज, पुजेचे साहित्य	✓	✓
३९.	कलात्मक	ज्यूटच्या विविध वस्तू, टी कोस्टर्स	✓	✗
४०.	नेचर्स वूड	सावंतवाडी स्पेशल लाकडी खेळणी	✓	✓
४१.	शीलाताई फूड प्रॉडक्टस्	लोणचे- ओली हळद, मोडमेथी, सरबत- कैरी, जॅम	✓	✓
४२.	हनीबंस	सर्व प्रकारचे मध	✗	✓
४३.	वंश गार्डन इनोव्हेटीव्हज्	फोल्डींग चटया, फोल्डींग वेताचे पडदे	✓	✓
४४.	श्री विनायक एंटरप्रायझेस	घरगुती सफाईचे विविध ब्रश	✓	✓
४५.	ओमकार मार्केटींग	हार्ड ॲनोडाइज्ड किचन वेअर्स, (बिडाची) भांडी	✓	✓
४६.	गेबी क्लिनिंग	साफ सफाईची उत्पादने	✓	✓
४७.	विनय एंटरप्रायझेस	किचनमधील विविध गृहोपयोगी स्टॅण्डस् होल्डर	✓	✓
४८.	महालक्ष्मी एंटरप्रायझेस	किचन वेअर्स	✗	✓
४९.	स्पायका होम ॲण्ड हायजिन	विविध प्रकारची स्वच्छके	✓	✗
५०.	एस.के.एंटरप्रायझेस	विविध प्रकारचे फर्निचर्स	✗	✓
५१.	माथेरान चप्पल (राजू मोरे)	पादत्राणे (माथेरान स्पेशल)	✗	✓

'ब्रेन गेम' कार्यशाळा

• चंद्रशेखर भोसले, स्वप्ना कुलकर्णी

"१४ डिसेंबर रोजी मुंबई ग्राहक पंचायत, गोरेगाव विभागातर्फे 'ब्रेन गेम' खेळायला येण्याचे आमंत्रण शशिकांत साळवी सर यांनी विभागाच्या ग्रुपवर केले. निमित्त होते विभागाची त्रैमासिक सभा."

ब्रेन ब्रेन गेम्स, मेंदू ताजातवाना कसा ठेवावा, जीवन आनंदी कसे जगावे, याबद्दल माहिती आणि सभेच्या वेळी मनोरंजक व मेंदूचे आरोग्य टिकवणारे खेळ... हा विषय महत्त्वाचा आणि सध्याच्या काळाची गरज ओळखणारा होता. सदस्यांनी मोठ्या संख्येने (सुमारे ८० सदस्य) उपस्थित राहून उत्साहवर्धक प्रतिसाद दिला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस साळवी सरांनी कार्यक्रमाची रूपरेषा सांगितली. प्रास्ताविकात त्यांनी विभागातील संघ, झालेली कामे आणि आगामी उपक्रम यांचा आढावा घेतला. तसेच समुपदेशक समिक्षा कुलकर्णी या आपल्या ग्राहक पंचायतीच्या तिसऱ्या पिढीतील सदस्य आहेत, त्यामुळे त्यांना आमंत्रित करताना त्या कुणी पाहुण्या नसून आपल्या घरच्याच आहेत, अशी भावना व्यक्त केली. नंतर विभागीय समिती सदस्य तनुजा गोडबोले यांनी प्रमुख पाहुण्या समिक्षा कुलकर्णी यांची थोडक्यात ओळख करून दिली.

सायकोलॉगिस्ट समिक्षा कुलकर्णी यांनी सुरुवातीला रॅपिड फायर प्रश्न विचारून जमलेल्या सर्वांना सतर्क आणि सचेतन केले. त्यामुळे प्रेक्षकांचा उत्साह वाढला. नंतर मेंदूला चालना देणारे काही शब्दकोड्यांसारखे व आकड्यांचे खेळ घेतले. विविध भौमितिक आकार बनविणे, – वाढवणारे (हात, डोळे, मेंदू यांचा समन्वय साधणारे) खेळ घेतले.

मानसशास्त्रज्ञ व मानसोपचारतज्ज्ञ यातील फरक समजावून सांगितला. तसेच एखाद्या व्यक्तीमधे काय बदल दिसून आले तर त्या व्यक्तीला तज्ज्ञांकडे न्यावे हे देखील समजावून सांगितले. असे मेंदूचे खेळ खेळल्याने मेंदूत कुठले बदल होतात, त्याचे काय फायदे असतात, ते सोप्या शब्दात स्पष्ट करून सांगितले.

हल्ली समाजात एकटेपणा वाढल्याने आपण चार लोकांत मिसळावे. स्वयंपाक, विणकाम, बागकाम, शिवणकाम याने देखील मेंदूला चालना मिळते, ज्यात मेंदूच्या सर्व भागांचा वापर होतो. मेंदू टवटवीत ठेवण्यासाठी मोबाईल ॲप आहेत. तसेच वरील ब्रेन गेम्सचा वापर करू शकतो, अशी माहिती त्यांनी दिली. सहभागींचे शंकासमाधानही केले.

कार्यक्रम संपताना शुभदा चौकर यांनी उपस्थितांना आगामी विभागीय मेळावा व सहलीला येण्याचे आवाहन केले. आभार मानताना चंद्रशेखर भोसले म्हणाले की, समिक्षा या वयाने लहान आहेत आणि समोर सर्व ज्येष्ठ नागरिक आहेत, तरीही त्यांनी आत्मविश्वासाने मार्गदर्शन केले आणि सर्व प्रश्नांची व्यवस्थित उत्तरे दिली. या विषयावर आणखी काही सत्रे घ्यावीत, असे सहभागींनी सांगितले.

तनुजा गोडबोले यांनी कार्यक्रमासाठी पुढाकार व प्रयत्न केले, त्याबद्दल सगळ्यांनी त्यांचे आभार मानले. ♦

दोन बाल-कथा संग्रहांचा संच

१. कुत्रा नव्हे मित्रच २. डायनोचा डिस्को आणि इतर कथा

लेखिका : विद्या डेंगळे

चित्रे : स्नेहा उपळेकर

प्रकाशक : दिलीपराज प्रकाशन

छापील किंमत : ₹३८०/-

वाटपातील किंमत : ₹२७२/-

लहान मुलांच्या कल्पनेच्या भराऱ्या अचंबित करणाऱ्या असतात. तसेच त्यांच्या विश्वात भोवताल आणि त्यांचे कुटुंबीय यांचे खास स्थान असते. यात विविध कथांतील प्राणी, पक्षी ते थेट घरातले पाळीव प्राणी या सगळ्यांचा समावेश असतो. असाच समावेश असणारी विद्या डेंगळे यांची दोन आकर्षक चित्रांनी सजलेली गोष्टींची पुस्तके सदस्यांच्या घरातील बच्चे कंपनीसाठी आणि इतर लहानग्यांना भेट देण्यासाठी निवडली आहेत.

'कुत्रा नव्हे मित्रच' हे पुस्तक वाचाल तर कुत्र्यांना वाचवाल, अशी ग्वाही लेखिकेने दिली आहे. इमानदार, रक्षक जणू घरातलाच एक असा कुत्रा. तोच कधी त्रासदायक, वेळी-अवेळी भुंकणारा, रस्त्यावर झुंडीने केकाटणारा... अगदी राग आणणारा. त्याच्या भूमिकेत शिरून त्याच्या लोभस लीला आणि त्यामागचे त्याचे विचार मांडणाऱ्या या पुस्तकातील कथा भन्नाटच आहेत. मुलांना अगदी वेड लावतील अशा या कथांत कुत्र्यांच्या मागण्या आहेत आणि कडक उन्हाने हैराण झाल्यावर कुत्र्यांनी त्यावर केलेले उपाय सुध्दा आहेत. ते मुळातूनच वाचायला हवेत.

लहान मूल हळूहळू चालायला शिकताना कसं धुबकन पडतं, धडपडत एकेक पाऊल हळूहळू स्थिर करत चालायला शिकतं, हे आपण पाहतो. पण अंड्यातून बाहेर आलेल्या इवल्याश्या पिल्लाला पंख फुटले की ते उडायला कसं, कधी शिकत असेल, त्याचे आई-बाबा त्याला शिकवत असतील का? या घटनेचे साग्रसंगीत वर्णन शृंगे कुटुंबाच्या सहलीच्या निमित्ताने सचित्र उभे झालेले दिसते. त्याचबरोबर मत्सालयात शिरलेल्या लिली नामक मांजरीने उडवून दिलेली गडबड, एखाद्या घरात काय चालत असेल याची उत्सुकता असणार साप, खारीपासून ते शीर्षकात असलेला डायनो आणि इतर बरेच प्राणी या कथासंग्रहातून आपल्याला त्यांची वेगळीच ओळख करून देतात.

- वसुंधरा देवधर

मालाडमध्ये वारली पेंटिंगची कार्यशाळा

मुंबई ग्राहक पंचायत मालाड विभागातर्फे शनिवार १५ नोव्हेंबरला अस्मिता ज्योती सोसायटीच्या कट्ट्यावर, कापडी पिशव्यांवर वारली पेंटिंगची कार्यशाळा घेण्यात आली. मेघना कुष्टे यांनी थोड्या वेळात, सोप्प्या प्रकारे वारली पेंटिंग शिकवले.

त्यानंतर धर्मपाल कांचन यांनी हाताच्या बोटांच्या सरस्वती मुद्रा, कुबेर मुद्रा, शिव मुद्रा, शंकर मुद्रा करून, आपले शारीरिक तसेच मानसिक आरोग्य चांगले कसे ठेवता येते, अभ्यास करतांना मन एकाग्र कसे होते, याविषयी माहिती दिली. त्यांची ओळख विजयालक्ष्मी यांनी करून दिली, तर मेघना कुष्टे यांची ओळख छाया मोहिते यांनी करून दिली. संघातील ज्येष्ठ सभासद सुरेखा पेडणेकर यांनी पाहुण्यांचे स्वागत फळे देऊन केले. सर्वांचे आभार वर्षा पवार यांनी मानले.

अल्पोपहार आणि प्रशस्तिपत्रके देऊन कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमाला ४५ जण उपस्थित होते. आयोजनासाठी अरविंद स्वार, संगीता स्वार, चित्रा जोशी, अर्चना बेलाडी, प्रगती साटम, रिटा लुईस यांचे सहकार्य लाभले.

♦

NCH Ensures Full Refund to Indigo passengers

We all were reading the stories of chaos due to cancellation of Indigo flights. One of senior journalist friends of Adv. Shirish Deshpande, our chairman had booked 5 flight tickets from Jalandhar to Mumbai on Indigo for 5th February 2026 by paying Rs. 30,065/-. The same morning he cancelled his booking. As per rules, when air ticket booking is cancelled within 24 hours, the passenger is entitled to full refund. However, he was refunded only Rs. 9725/- thereby charging exorbitant Rs. 21,240/-as cancellation charges.

He therefore enquired with Shirish Deshpande whom to approach? He had been asked to approach National Consumer Helpline (NCH) on number 1915. And to his surprise, within a couple of hours of his lodging complaint with NCH, he got the intimation from Indigo on the same day, giving reference to his complaint to NCH and granting balance full refund of Rs. 21,240/- in less than 2 hours of his complaint.

♦

Govt Announces Ceiling on Airfares

The Government has stepped in to curb spiralling air ticket prices, imposing temporary fare caps on domestic flights after massive disruptions triggered by IndiGo's week-long operational meltdown.

The move comes after IndiGo cancelled at least 1,600 flights over the week, triggering nationwide chaos, shrinking capacity and leading to what the ministry of civil aviation called an unreasonable surge in fares across major routes.

In an order Govt has issued, the ministry said airlines will not be allowed to charge beyond the notified ceiling for different stage lengths. The maximum fares set are :

- ₹ 7,500 for routes up to 500 km
- ₹ 12,000 for 500–1,000 km
- ₹ 15,000 for 1,000–1,500 km
- ₹ 18,000 for routes above 1,500 km

These limits exclude UDF, PSF and other taxes, and do not apply to Business Class or RCS-UDAN flights.

The Directorate General of Civil Aviation (DGCA) has also been instructed to monitor and regulate fares on the listed routes.

The ministry has said the decision was taken in public interest and will remain in force until prices stabilise or a further review is conducted. The fare caps will apply to all bookings, whether made directly on an airline website or through online travel portals.

Airlines have been told to maintain adequate ticket availability across fare buckets and explore adding capacity on high-demand sectors. They must also avoid steep fare spikes on routes hit by cancellations and provide maximum support to affected passengers, including rebooking options where possible.

According to the order, the government has exercised its regulatory powers to ensure fair and reasonable fares and to prevent 'opportunistic pricing' during the ongoing disruption.

(compiled news)

EAT RIGHT QUIZ

1.	Bakery products (cakes, biscuits, pizza-base) are an invisible source of .							
	A)	sodium	B)	sugar	C)	saturated fat	D)	All of the above
2.	Which is the best way to consume vitamin C rich fruits (Amla, Guava) to retain most of their nutrients?							
	A)	Fried	B)	Raw	C)	Steamed	D)	Boiled
3.	Why is it important to avoid cross contamination in the kitchen?							
	A)	To prevent the spread of bacteria, so that it remains healthy						
	B)	To improve the taste of food						
	C)	To reduce cooking time						
	D)	To save on cleaning supplies						
4.	Selection of Healthy food eating starts with.							
	A)	Reading food product and company name before buying						
	B)	Reading nutrition chart specifically for sugar, sodium, trans fat, calorie content on food label						
	C)	Serving size						
	D)	Allergens information						
	E)	A, B, C, D						
5.	Which of these is a healthy habit to prevent obesity?							
	A)	Skipping meals	B)	Eating balanced food	C)	Consuming sugary cold drinks often	D)	sitting all day





6.	How often should you clean your refrigerator to ensure food safety?							
	A)	Every six months	B)	Once a year	C)	Once a month	D)	Once a fortnight
7.	Which ingredient on a food label indicates the presence of added sugar?							
	A)	Sodium Chloride	B)	Ascorbic acid	C)	High fructose corn syrup	D)	Beta carotene
8.	Milk is fortified with which two vitamins?							
	A)	Vitamin A D	C)	Vitamin B6 B12	B)	Vitamin C E	D)	Vitamin B1 B3
9.	What is mindful eating?							
	A)	Eating as fast as possible	B)	Paying attention to food and hunger clues	C)	Eating while watching TV	D)	Ignoring meal timings
10.	What is the meaning of the + F symbol in the food label?							
	A)	Foreign food	B)	Nutrients are fortified (added)	C)	Doctor recommended	D)	A, B, C





Answers : 1. ᗡ 2. ᗺ 3. A 4. Ǝ 5. ᗺ 6. ᗡ 7. Ɔ 8. A 9. ᗺ 10. ᗺ

... पान क्र. २ वरून)

पुण्यातील मुलांना चतुर ग्राहक घडवणारी शिबिरे

उत्साहाने शिबिरात सहभाग घेतला. अनेक प्रश्न, शंका विचारल्या. नेहा जोशी यांनी मुलांच्या सर्व प्रश्नांना उत्साहाने उत्तरे दिली. या विषयाबाबतचे औत्सुक्य मुलांमध्ये निर्माण झाले, असे जाणवले.

दोन्ही शाळेतील शिक्षकांनी शिबिर खूप छान झाल्याचे आवर्जून सांगितले. मुलांचेही अभिप्राय अतिशय छान होते. तसेच या दोन्ही शाळांच्या मुख्याध्यापकांनी अशा प्रकारचे वर्ग पुढील वर्षी शाळेमध्ये नियमित घ्यावेत असे सुचविले. एकूणच दोन्ही शिबिरांचा अनुभव अतिशय आनंददायी होता. पुढील पिढी सजग ग्राहक व्हावी यासाठी आपणही प्रयत्न करूया, असे पुणे वितरण समितीतील कार्यकर्त्यांनी ठरविले आहे.

हसत खेळत देऊ विद्यार्थ्यांना ग्राहक शिक्षण,
सजग ग्राहक तत्त्वांचे करू बीजरोपण! ♦

प्रगती विद्यालयातील विद्यार्थी 'ग्राहक' म्हणजे नेमके कोण कोण? हे मन लावून ऐकताना..